महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या कलम-३ मधील तरतूदींच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करण्यास मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्र.-संकीर्ण-२०१७/प्र. क्र.१४४/समन्वय**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.**
**दि. ७ फेब्रुवारी, २०१८.**

**संदर्भ** :-१. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१)
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/ प्र. क्र.५३/समन्वय, दि.२४/११/२०१५.
३. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संकीर्ण-२०१६ / प्र. क्र.६८/समन्वय, दि.२८/९/२०१६.
४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.६८/समन्वय, दि. २८/११/२०१७.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या कलम ३ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियम लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि वेळोवेळी पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ व ३ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणाऱ्या ११ सेवा अधिसुचित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, संदर्भ क्र. ४ अन्वये उपरोक्त ११ सेवांमधील "अनुसूचित जाती /जमाती अत्याचारास बळी पडलेल्या सदस्यांना अर्थसहाय्य" ही सेवा वगळण्यात आली आहे. आता, **अनुदानित अपंगांच्या शाळा/ कर्म शाळातील रिक्त पदे भरण्याकरीता स्वयंसेवी संस्थांना ना हरकत प्रमाणपत्र देणे** व **अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ४९ मधील तरतूदीप्रमाणे अपंग क्षेत्रात पुनर्वसन विषयक कार्य करण्यासाठी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र देणे** ह्या दोन सेवा अधिसुचित करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

## शासन निर्णय :-

१. या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील आयुक्त, अपंग कल्याण, पुणे व अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या खालील सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत अधिसुचित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| सेवेचे नाव | सेवा पुरविणारा अधिकारी (पदनाम) | कालावधी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुदानित अपंगांच्या शाळा/ कार्यशाळातील रिक्त पदे भरण्याकरीाता स्वयंसेवी संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे | आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | अर्ज केल्यानंतर ३ महिने | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. | मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ४९ मधील तरतूदीप्रमाणे अपंग क्षेत्रात पुनर्वसन विषयक कार्य करण्यासाठी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र दणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/ सहायक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर व उपनगर | अर्ज केल्यानंतर ३ महिने | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. | मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. |

२. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी उपरोक्त सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत अधिसुचित करणे व सदर सेवा विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

३. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्यासाठी आकारावयाची फी निश्चित करण्याची मुभा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांना राहील. तसेच संबंधीत कार्यालयाची रचना विचारात घेऊन पदनिर्देशित अधिका-यांमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांना राहतील. तथापि त्यांना सेवा पुरविण्याच्या विहित कालावधीमध्ये बदल करण्याचे अधिकार असणार नाहीत.

४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ (२) अनुसार आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी ते पुरवित असलेल्या लोकसेवांची सूची, नियत कालमर्यादा, विहित नमुना किंवा शुल्क, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशील सूचना फलकावर तसेच त्यांच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर प्रदर्शित करावा व तशा सूचना त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांना द्याव्यात.

५. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी उपरोक्त सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत अधिसुचित करण्याची व त्यानुसार अधिसुचनेच्या दिनांकापासून अंमलबजावणी करण्याची कार्यवाही तातडीने करावी.

६. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०२०७१४२५१४४१२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2018.02.07 14:31:51 +05'30'

**(सि. अ. झाल्टे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५) सर्व सन्माननिय विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
६) मा. मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय
७) मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (पत्राने)
८) मा. मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय (पत्राने)
९) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय.
१०) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१४) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
१५) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१८) सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१९) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२०) सर्व मंत्रालयीन विभाग
२१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने.
२२) निवड नस्ती (समन्वय)